"शासकीय कृषी जलसिंचन योजनांचे लातूर जिल्हयाच्या कृषी विकासातील योगदान (सन 2010 ते 2024)”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानवविज्ञान विद्याशाखेअंतर्गत ‘अर्थशास्त्र’ विषयाच्या पीएच.डी.
(विद्यावाचस्पती) पदवीकरिता सादर करावयाचा
शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

प्रा.प्रेमकुमार बालाजी गव्हाणे

मार्गदर्शक

डॉ.शिवराज रामराव पाटील

प्राध्यापक व अर्थशास्त्र विभागप्रमुख
स्वामी विवेकानंद महाविद्यालय,
शिरुर (ताजबंद) ता.अहमदपूर जि.लातूर

संशोधन केंद्र

अर्थशास्त्र विभाग
शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

डिसेंबर - 2024

"शासकीय कृषी जलसिंचन योजनांचे लातूर जिल्हयाच्या कृषी विकासातील योगदान (सन 2010 ते 2024)"

1) प्रस्तावना :

भारत हा कृषिप्रधान देश आहे. देशातील 70 टक्के लोक कृषी व्यवसायात कार्यरत आहेत. भारतीय अर्थव्यवस्था कृषिप्रधान असल्याने भारताच्या औद्योगिक आर्थिक विकासाचा प्रमुख स्रोत शेती हाच आहे. भारत हा एक खेड्यांचा देश आहे आणि कृषी व्यवसाय ग्रामीण व्यवसाय असल्यामुळे धानप्रक्रिया उद्योगसुद्धा ग्रामीण उद्योग आहे. ग्रामीण क्षेत्रात धानाचे उत्पादन शेतमजुराची उपलब्धता, ग्रामीण परिवहनाची साधने आणि उत्पादनाला स्थानिक मागणी असल्याने हा उद्योग ग्रामीण उद्योग म्हणून संबोधला जातो.

पाणी हा माणसाच्या जीवनाचा आधार आहे. संपूर्ण देशाची, राज्याची सामाजिक आणि आर्थिक समृद्धी पाण्याच्या साठ्यावर अवलंबून आहे. शाश्वत विकासासाठी पाणी अमूल्य आहे. आज राज्यातील भूजल वापरापैकी 85 टक्के वापर सिंचनासाठी, 10 टक्के वापर औद्योगिकतेसाठी आणि निव्वळ 5 टक्के वापर पिण्याच्या पाण्यासाठी होतो. महाराष्ट्र राज्याची भूपृष्ठीय स्थिती पाहिल्यास लक्षात येते की, यात 1/3 डोंगराळ, 1/3 अवर्षणग्रस्त व 1/3 अतिपर्जन्याचे क्षेत्र आहे. 97.72 टक्के कठीण पाषाणाची भूशास्त्रीय रचना आहे. येथे पर्जन्याबाबत लहरीपणा असल्याने पाऊस पडण्यात बरीच विषमता आढळते. आज राज्यभर भूजल पातळी खालावत चालली आहे. बोअरवेल्सची संख्या प्रचंड वाढल्याने पाण्याचा उपसा मोठ्या प्रमाणात होत आहे.

महाराष्ट्र हे एक भारतातील प्रगतीशील राज्य म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राचा बऱ्याच प्रमाणात विकास झालेला असला तरी इतर

विकसित राज्याच्या तुलनेत महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राचा विकास हा कमीच झालेला आहे असे लक्षात येते. सिंचनाबाबत तर महाराष्ट्राची स्थिती अतिशय दयनीय असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील एकूण लागवडीखालील क्षेत्रापैकी केवळ 16 टक्के क्षेत्र हे सिंचन क्षेत्राखाली आहे. तर उर्वरित 84 टक्के क्षेत्र हे मान्सूनच्या पावसावर अवलंबून आहे. त्यामुळेच महाराष्ट्रातील कृषी उत्पादनात मोठ्या प्रमाणात चढ-उतार होताना दिसून येतात. परिणामी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नात अनिश्चितता दिसून येते.

अलिकडील काळात पर्यावरणीय बदलांमुळे मोसमी पावसाच्या वेळापत्रकात बदल होत आहे. एखाद्या वर्षी पाऊस अधिक झाल्याने कृषी उत्पादनात घट होते तर कधी पाऊस कमी पडल्याने किंवा योग्य वेळेत अपुरा पाऊस पडल्याने कृषी उत्पादनात घट झाल्याचे दिसून येते. म्हणूनच शेतकऱ्यांचे उत्पादन खर्च भरून निघणार नाही अशी स्थिती निर्माण होते. अशा वेळी शेतकरी आधारभूत किंमतीत वाढ करण्यासाठी किंवा आधारभूत किंमतीने शासनाने कृषी उत्पादन खरेदी करण्यासाठी आंदोलन करतात. अशी खरेदी शासनाकडून झाली नसल्यास शेतकरी आपसूकच कर्जाच्या जाळ्यात अडकून आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतो.

लातूर जिल्हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा विभागातील एक महत्वपूर्ण जिल्हा आहे. या जिल्हयाची निर्मिती 16 ऑगस्ट 1982 रोजी झाली आहे. लातूर हे महाराष्ट्रातील 16 व्या क्रमांकाचे मोठे शहर आहे. नागरी लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या 56.01 टक्के आहे. लातूर जिल्हयातील प्रमुख तालुके रेणापूर, अहमदपूर, औसा, लातूर, निलंगा, उदगीर, देवणी, जळकोट, चाकूर, शिरुर अनंतपाळ आहेत. शिक्षण, शेती, व्यापार उद्योग या तिन्ही महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये प्रगती केलेले फार कमी जिल्हे आहेत. यामध्ये

आपल्याला लातूरचे नाव आवर्जून घ्यावे लागेल. मराठवाड्यात लातूर आपला वेगळा ठसा उमटवीत आहे. उस्मानाबाद जिल्हयाच्या विभाजनानंतर निर्माण झालेल्या लातूरने विकासाच्या दिशेने अतिशय वेगाने वाटचाल केली आहे. तसेच लातूर जिल्हयाचा औद्योगिकीकरणात सिंहाचा वाटा असणारा उद्योग म्हणजे कृषी आधारित उद्योग होय. त्यामध्ये साखर कारखाने, दुध डेअरी, तेलबिया, दाळमीळ, कुक्कुटपालन, मत्स्यव्यवसाय इत्यादी आहेत. महाराष्ट्रात साखर उद्योग हा कृषी आधारित असा प्रमुख उद्योग मानला जातो. ग्रामीण भागातील सुमारे अडीच कोटी लोकांचे जीवन साखर उद्योगावर अवलंबून आहे. साखरेतून महाराष्ट्राला सुमारे 2200 कोटी रुपयांचा महसूल प्राप्त होतो. एका साखर कारखान्यामुळे ऊस लागवडीपासून साखर बाजारपेठेत पोहोचेपर्यंत सर्व प्रकारच्या प्रक्रियांमध्ये 5000 लोकांना थेट रोजगार उपलब्ध होतो. या आकडेवारीने महाराष्ट्रातील साखर उद्योगाचे स्थान अधोरेखित होते. राज्यात एकूण 202 नोंदणीकृत साखर कारखाने असून त्यामधून वर्षाला सुमारे 12000 कोटींची उलाढाल होते. लातूर जिल्हयातील सहकारी आणि खाजगी असे एकूण 10 साखर कारखाने सुरू आहेत. जिल्हयात एकूण 51000 हेक्टर ऊसाचे क्षेत्र आहे. मराठवाड्यात साखर कारखानदारीला दिशा देण्याचे काम लातूर जिल्हयातील सहकारी आणि खाजगी साखर कारखानदारीने केले आहे.

लातूर जिल्हयामध्ये शेतकऱ्यांनी दुग्ध व्यवसाय हा शेतीपूरक व्यवसाय म्हणून स्वीकारल्यामुळे वर्षभर उत्पादन व रोजगाराचे साधन निर्माण झाले आहे. दुग्धव्यवसाय आणि कुक्कुटपालन व्यवसाय यासारखाच रेशीम शेती व्यवसाय हा शेतीस पूरक व्यवसाय आहे. कापूस सोयाबीन यासाठी प्रसिद्ध असलेल्या मराठवाड्याला आज दुष्काळ, गडगडलेल्या शेतमालाच्या किंमती, मजुरी व वाढता उत्पादन खर्च या समस्यांनी ग्रासले आहे.

हैदराबादच्या निजाम काळात लातूर प्रमुख व्यापार केंद्र बनले. हे कृषी आधारे अर्थव्यवस्था व औद्योगिक केंद्रसुद्धा बनले. लातूरच्या आर्थिक विकासात कृषी क्षेत्राचा अमूल्य वाटा आहे. म्हणून जिल्ह्यातील पाणीसाठ्याचे योग्य व्यवस्थापन कशा पद्धतीने करता येऊ शकेल व तसेच पाणीसाठ्याचे योग्य व्यवस्थापन करून कृषी उत्पादनात व शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ घडवून आणणाऱ्या सर्व घटकांचा अभ्यास करणे आवश्यक ठरेल.

2) संशोधनाची उद्दिष्ट्ये :

प्रस्तुत संशोधनासाठी खालील उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली आहेत.

- लातूर जिल्ह्यातील शासकीय कृषी जलसिंचन पद्धतीचा आढावा घेणे.
- लातूर जिल्ह्यातील सिंचन क्षेत्रात शेती व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे.
- लातूर जिल्ह्यात पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण करण्यासाठी शेतकऱ्यांनी केलेल्या प्रयत्नांचा अभ्यास करणे.
- आर्थिक विकासातील कृषी जलसिंचनाच्या भूमिकेचा अभ्यास करणे.
- कृषी जलसिंचनामुळे रोजगारात झालेला बदल अभ्यासणे.

3) संशोधनाची गृहितके :

प्रस्तुत संशोधनासाठी खालील गृहितके निश्चित करण्यात आली आहेत.

- कृषी जलसिंचनासंबंधीच्या शासकीय योजनांचा शेतकऱ्यांना पर्याप्त लाभ मिळत नाही.
- कृषी जलसिंचन क्षेत्राखालील जमिनीचे प्रमाण वाढल्यास त्याची आर्थिक विकासाला मदत होऊ शकते.

- लातूर जिल्ह्यातील शेतकरी पाण्याचा अपव्यय होणार नाही अशा कृषी जलसिंचन पद्धतीचा वापर अधिक प्रमाणात करत नाहीत.

4) संशोधन पद्धती :

सदरील संशोधनासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला जाईल व त्यासाठी प्राथमिक व द्‌वितीयक माहितीचे संकलन पुढील स्रोतांद्‌वारे केले जाईल.

प्राथमिक माहिती : प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक माहिती संकलित करण्यासाठी मुलाखतीद्‌वारे अनुसूची भरून माहिती संकलन केले जाईल. लातूर जिल्ह्यातील कृषी जलसिंचनांतर्गत कृषी व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांची विविध स्तरावर नमुना निवड पद्धतीद्‌वारे 400 शेतकऱ्यांची निवड करून त्यांच्याद्‌वारे उपलब्ध माहितीच्या आधारे संशोधन कार्य पूर्ण केले जाईल.

द्‌वितीयक माहिती : प्रस्तुत संशोधनासाठी द्‌वितीयक माहिती म्हणून कृषी जलसिंचनावर झालेली संशोधने व त्यावरील अहवाल, विविध तज्ज्ञांचे संदर्भग्रंथ, विषयाशी संबंधित पुस्तके, सर्वेक्षण अहवाल, संस्मरण पत्रे, दैनंदिनी, शासकीय कार्यालयातून उपलब्ध आकडेवारी, दैनिक, वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके, त्रैमासिके, जिल्हा सांख्यिकीय अहवाल तसेच इंटरनेटवर उपलब्ध माहिती व आकडेवारीचा उपयोग केला जाईल.

5) नमुना निवड

संशोधनासाठी जो विषय निवडलेला असतो त्या विषयासंबंधी संपूर्ण विश्व किंवा समग्राचे अध्ययन करणे संशोधनकर्त्याला शक्य नसते. म्हणून समग्राच्या प्रातिनिधिक एककाची निवड करून त्याचेच अध्ययन केले जाते. नमुना निवड या तंत्रामुळे संशोधनात वेळ, पैसा व श्रम यांची बचत होते. प्रस्तुत संशोधन

कार्यासाठी निवड केलेल्या नमुन्याची निवड ही सहेतुक नमुना निवड पद्धतीने करण्यात येणार असून शासकीय कृषी जलसिंचन योजनांचा वापर करणाऱ्या 400 शेतकऱ्यांची नमुना निवड करण्यात येणार आहे.

6) विषयाचे महत्त्व :

लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नात शाश्वतता निर्माण करावयाची असल्यास जिल्ह्यातील कृषी सिंचनाचे क्षेत्र वाढवणे आवश्यक आहे. लातूर जिल्ह्यात पडणाऱ्या पावसाचे योग्य प्रमाणात नियोजन केल्यास निश्चितच सिंचन क्षेत्रात वाढ होऊ शकेल. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास आणखी सिंचन क्षेत्रात वाढ करता येऊ शकेल. जे शेतकऱ्यांना निश्चितच उपयोगी ठरेल. त्याच्यावर अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

7) संशोधन क्षेत्र कालावधी :

प्रस्तुत संशोधन अभ्यास विश्लेषणात्मक स्वरूपाचा आहे. हे संशोधन लातूर जिल्ह्यापुरते मर्यादित आहे. तसेच या संशोधनाकरिता सन 2010 ते 2024 असा एकूण 15 वर्षांचा कालावधी घेण्यात आला आहे.

8) विषयाची व्याप्ती व मर्यादा :

प्रस्तुत संशोधनाच्या मर्यादा खालीलप्रमाणे आहेत.

- प्रस्तुत संशोधन लातूर जिल्ह्यापुरतेच मर्यादित राहील.
- प्रस्तुत संशोधनात सिंचन क्षेत्राचा अभ्यास केला जाईल.
- प्रस्तुत संशोधनात केवळ बागायती क्षेत्रात कृषी व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांचा अभ्यास केला जाईल.
- या संशोधनात लातूर जिल्ह्यातील कृषी जलसिंचनाचा अभ्यास केवळ आर्थिक दृष्टिकोनातूनच केला जाईल.

9) पूर्व साहित्याचा आढावा

जलसिंचनाचा अभ्यास करण्यासाठी शासनामार्फत विविध आयोग, समित्या नेमून अभ्यास करण्यात आलेला आहे. शासकीय योजना, जलसिंचन आणि कृषी यांसदर्भाने काही संशोधकांनी संशोधन कार्य केलेले आहे. यासंदर्भात काही पुस्तके प्रकाशित असून त्यांचा उपयोग प्रस्तुत संशोधनाच्या तथ्य संकलनासाठी करण्यात येणार आहे.

10) नियोजित संशोधनाची रुपरेषा :

प्रस्तुत संशोधनात खालील प्रकरणांचा समावेश केला आहे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रकरण दुसरे : संशोधन साहित्याचे पुनरावलोकन व संशोधन पद्धती

प्रकरण तिसरे : लातूर जिल्ह्याची आर्थिक व सामाजिक ओळख

प्रकरण चौथे : लातूर जिल्ह्याच्या आर्थिक विकासात कृषी जलसिंचनाची भूमिका व विकास

प्रकरण पाचवे: लातूर जिल्ह्यातील कृषी जलसिंचनाचा आर्थिक विकासावरील परिणाम

प्रकरण सहावे : निष्कर्ष आणि शिफारशी

संदर्भ ग्रंथ सूची

1) प्रा.उपासे शिवाजी मारोती, 'सिंचनासाठी नवी दिशा', पुरंदरे प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, 2015

2) प्रा.डॉ.कटमुसरे एस.बी., 'कृषी अर्थशास्त्र', पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, 2013

3) प्रा.घारे मुकुंद, 'पाणलोट क्षेत्र विकास', अफार्म प्रकाशन, मुंबई, 2008

4) प्रा.घोंगडे ए.एच., 'जलव्यवस्थापन काळाची गरज', साहील प्रकाशन, औरंगाबाद, 2015

5) डॉ.पाटील अ.व्य., 'दुष्काळी जमिनीसाठी अधिक पाणी', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, 1994

6) अर्थ व सांख्यिकी संचालनालय महाराष्ट्र शासन, मुंबई, 'जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन', महाराष्ट्र शासन, मुंबई,

7) इंटरनेट

8) www.latur.nic.in

संशोधक
प्रा.प्रेमकुमार बालाजी गव्हाणे

मार्गदर्शक
डॉ.शिवराज रामराव पाटील
प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख
स्वामी विवेकानंद महाविद्यालय
शिरुर (ताजबंद) ता.अहमदपूर जि.लातूर

Dr.S.R.Patil
Professor of Economics
S.V.College
Ahmedpur